पोपली अंमलदार

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** राहुरी

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0356 **Year (वर्ष):** 2025

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/03/2025 07:08

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

Time Period (कालावधी):

Date From (दिनांक पासून): 20/03/2025
Date To (दिनांक पर्यंत): 20/03/2025
Time From (वेळेपासून): 12:59 वजे
Time To (वेळेपर्यंत): 20:36 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिनांक): 21/03/2025 **Time (वेळ):** 06:30 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**

Entry No. (नोंद क्र.): 006

Date & Time (दिनांक आणि वेळ): 21/03/2025 06:51 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गोरक्ष आडसुरे यांचे कार्यक्रम, वरवंडी,राहुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सतिष भाऊसाहेब फुलसौंदर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	तनपुरवाडी रोड,राहुरी,राहुरी,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	तनपुरवाडी रोड,राहुरी,राहुरी,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8830153027

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	रमेशकुमार जगन्नाथ धडील			1. परदेशी यांचे घर,डावरे गल्ली, अहिल्यानगर,अहिल्यानगर, राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	20,000/रुपये त्यात 500/	20,000.00

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
			रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा	

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

20,000.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद दि.20/03/2025

मी सतिष भाऊसाहेब फुलसौंदर, वय 41 वर्षे, धंदा शेती व मत्स्य शेती, रा. तनपुरेवाडी रोड, ता.राहुरी, जि. अहिल्यानगर, मो.नं. 8830153027.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि. 19/03/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र.वि. अहिल्यानगर यांना फोन करुन लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि. 20/03/2025 रोजी 11/00 वा चे सुमारास अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी अहिल्यानगर येथे येवुन सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 11/15 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे पुर्ण नाव, पत्ता विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी शासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, माझी पत्नी सौ. पौर्णिमा सतिष फुलसौंदर हिच्या नावे प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत भुजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन हा प्रकल्प 2020-21 मध्ये मंजुर झाला आहे. तसेच माझी बहीण स्वाती भाऊसाहेब फुलसौंदर हिच्या नावे देखील प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत भुजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन हा प्रकल्प 2022-23 मध्ये मंजुर झाला आहे. माझी पत्नी व बहीणीच्या वतीने प्रकल्पांचे सर्व कामकाज मी स्वतः पाहतो. शासनाच्या अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे कामकाज पुर्ण झालेले आहे. माझी पत्नी पौर्णिमा हिच्या नावे असलेल्या प्रकल्पास शासनाकडुन आजपावेतो 3,88,800/-रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच माझी बहीण स्वाती फुलसौंदर हिच्या नावे असलेल्या प्रकल्पास शासनाकडुन 29,16,000/-रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. दोन्ही प्रकल्पांचे उर्वरित अनुदान शासनाकडुन येणे बाकी आहे. उर्वरित अनुदान मिळणे करीता प्रकल्पाच्या कामांची बिले मी श्री. रमेश धडील, सहायक आयुक्त मत्स्य व्यवसाय (तांत्रिक) अहिल्यानगर यांच्या कार्यालयात जमा केले आहेत. तसेच सहायक आयुक्त श्री. धडील यांनी समक्ष स्थळ पाहणी करून त्याबाबत अहवाल तयार केला आहे. सदर कार्यवाहीस तीन चार महिन्यांचा कालावधी उलटुन गेला आहे. परंतु अदयाप अनुदानाची उर्वरित रक्कम मिळालेली नाही. दि. 07/03/2025 रोजी मी सहा.आयुक्त यांच्या कार्यालयात जावुन त्यांना अनुदानाबाबत विचारणा केली असता त्यांनी तुमचा अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असेल तर दोन प्रस्तावाचे मिळुन 30,000/-रुपये दयावे लागतील असे म्हणाले. मी त्यांना मागील अनुदानावेळी देखील माझेकडुन तुम्ही 50,000/-रुपये घेतले होते असे म्हणालो असता त्यांनी ते मागच्या कामाचे झाले, आता उर्वरित अनुदानाकरीता प्रस्ताव सादर करायचे 30,000/-रुपये दयावे लागतील असे म्हणाले. अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकरीता पैशांची आवश्यकता नाही हे मला माहिती आहे. प्रस्ताव सादर करण्याकरीता श्री. रमेश धडील हे माझ्याकडे लाचेची मागणी करत असल्याचे मला समजले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज रोजी सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक) या कार्यालयात जावुन सहा.आयुक्त श्री. धडील यांची भेट घेणार आहे व त्यांना आमचे वरील प्रकल्पांचे उर्वरित अनुदान मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी त्यांनी सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व श्री. धडील यांच्यात कुठलाही आर्थिक व्यवहार नाही. तसेच भांडण तंटा

नाही. धडील यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील. आता मी 1) व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ मर्यादित यांचे कार्यालयाकडुन पौर्णिमा फुलसौंदर हिचे नावे पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन प्रकल्पासाठी जलक्षेत्र निश्चित करणेबाबत दिलेल्या पत्राची छायांकित प्रत व 2) सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) अहमदनगर यांचे कार्यालयाकडुन स्वाती भाऊसाहेब फुलसौंदर हिचे नावे निलक्रांती योजनेतुन मंजुर पिजरा मत्स्यसंवर्धन घटकाखाली लाभाथ्यांना प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या निकषाप्रमाणे अर्थसहाय्य मंजुर करणेबाबत दिलेल्या पत्राची छायांकित प्रत हजर करत आहे.वगैरे मजकुराची तक्रार सांगितली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ. निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 12/59 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) या कार्यालयात गेलो. थोडया वेळाने धडील साहेब कार्यालयात आले. मी व पंच नं. 1 त्यांचे टेबलजवळ गेलो. मी त्यांना चहा घेवु असे म्हणालो. त्यानंतर धडील साहेब व आम्ही कार्यालयातुन निघुन बोलत बोलत जिन्याने पाय-या उतरत कार्यालयाचे खाली आलो. आमचेत प्रकल्पाचे अनुदानाबाबत चर्चा झाली. धडील यांनी प्रस्ताव मी पाठवितो, चौघा लोकांच बघा विचारून असे म्हणाले. मी त्यांना संध्याकाळी पोहोच करतो असे म्हणालो असता त्यांनी काय असेल ते तुमच्या पध्दतीने, तुमच्या हिशोबाने दया, नंतर बोलेल मी, बघु ... गोरक्षच्या तिथे या ... असे म्हणाले. मी त्यांना संध्याकाळी भेटु असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच 1 असे तेथुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 14०:13 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ.निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता धडील साहेब यांनी आमचे प्रकल्पाचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात तुमच्या पध्दतीने, तुमच्या हिशोबाने दया... असे म्हणुन लाचेची मागणी केली परंतु स्पष्टपणे लाचेच्या रकमेचा उल्लेख न आल्याने तसेच त्यांनी संध्याकाळी गोरक्षच्या तिथे या असे सांगितल्याने सर्वानुमते धडील यांचेविरूध्द वरवंडी, ता.राहुरी येथील गोरक्ष आडसुरे यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी जावुन पुन्हा लाचमागणी पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे साहेबांनी मला वरवंडी, ता.राहुरी गावाजवळील सुरक्षित ठिकाणी थांबुन राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी वरवंडी गावाच्या अलीकडे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. थोडया वेळाने तेथे श्री. त्रिपुटे साहेब व सापळा पथक आले. मी शासकिय वाहनात बसलो. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना पुन्हा सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ. निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 18/30 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे वरवंडी येथील श्री. गोरक्ष आडसुरे यांचे मोरया उदयोग समुहाचे उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी गेलो. तेथे उद्घाटनाचा कार्यक्रम चालु होता. तेथे मी धडील साहेबांजवळ जावुन बसलो. तेथे गर्दी असल्याने धडील साहेबांनी मला बाहेर जावुन बोलु असे खुनवले. त्यानंतर मी व धडील साहेब कार्यक्रमाच्या ठिकाणापासुन थोडे बाजुला आलो. आमचे पाठोपाठ पच न. 1 आले. तेथे धडील साहेब यांचेत व माझेत आमच्या प्रकल्पांबाबत चर्चा झाली. धडील यांनी मला पौर्णिमा फुलसौंदरच्या प्रकल्पाचे काम केले मी, मॅडमशी काही बोलणे झाले का असे विचारले असता मी त्यांना मॅडमशी नाही बोलणे झाले, तुम्हाला किती दयायचे असे विचारले असता त्यांनी दोन प्रकरणांचे पंधरा पंधरा असे मिळुन 30,000/-रुपये लाचेची मागणी केली. मी त्यांना वीस हजार देतो, तुम्ही किती वेळ आहेत येथे असे म्हणालो असता त्यांनी तुमच्या पध्दतीने बघा, तुम्हाला कसं वाटेल तसं बघा, मी आहे अजुन एक तासभर असे म्हणुन तडजोडीअंती 20,000/-रु. लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यानंतर थोडा वेळ चर्चा करून मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 19०:36 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता धडील साहेब यांनी

माझ्याकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 20,000/-रु. लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर मी लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी माझ्या बचतीतुन 20,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला. त्यानंतर धडील यांचेविरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. पोकाँ. निमसे यांनी 20:21 वा. दरम्यान व्हाँईस रेकाँर्डर चालु करून ते माझ्या ताब्यात दिले. धडील यांचेविरूध्द वरवंडी येथील श्री.गोरक्ष आडसुरे यांचे मोरया उदयोग समुहाचे उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी लाचेचा सापळा आयोजित करण्याकरीता मी, पंच नं. 1 असे माझेकडील दुचाकीने व पो.उपअधी.श्री. त्रिपुटे आणि सापळा पथक असे शासकिय वाहनाने सदर कार्यक्रमाच्या ठिकाणाजवळ गेलो. सदर कार्यक्रामाच्या ठिकाणी सापळा पथक सापळा लावुन थांबले. मी व पंच दुचाकीवरून उतरून पायी चालत कार्यक्रमात गेलो. तेथे समोरच धडील साहेब उभे होते. मला पाहिल्यानंतर ते माझे जवळ आले. त्यानंतर ते माझेशी बोलत बोलत कार्यक्रम ठिकाणाच्या बाहेरील पार्किंगकडे चालत आले. त्यांनी मला आजच्या यादीत एक नाव आहे बर का तुमचे असे म्हणाले असता मी त्यांना दोन नावे आहेत सर आमचे असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला यादी जुनी आहे असे सांगितले. धडील यांनी लाचेची रक्कम स्विकारण्याकरीता त्यांचा उजवा हात पुढे केला असता मी माझे जवळील लाचेच्या रकमेची घडी धडील साहेबांसमोर धरून हाँटेलवर जावुन आणले आहेत असे म्हणालो त्यावेळी धडील साहेबांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. मी त्यांना आमच्या प्रकरणात सहकार्य करा असे म्हणुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.त्रिपुटे, सापळा पथक व पंच क्र.2 असे माझेजवळ आले, पोकाँ. निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे साहेबांनी मला व पंच नं.1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता आम्ही समोर उभे असलेले धडील साहेबांकडे बोट दाखवुन हे सहा. आयुक्त धडील साहेब आहेत त्यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने सदर लाच रक्कम ताब्यात घेतली व सोबतच्या कर्मचा-यांच्या मदतीने धडील साहेब यांना ताब्यात घेतले. श्री. त्रिपुटे यांनी धडील यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रमेशकुमार जगन्नाथ धडील, वय 57 वर्षे, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक), अहिल्यानगर, ह.रा. परदेशी यांच्या घरात भाडयांने, डावरे गल्ली, अहिल्यानगर, मुळ रा. ए-5, अँक्वालाईन रेसिडेन्सी, धोंगडे नगर नाशिकरोड, नाशिक असे सांगितले. धडील यांना गोरक्ष आडसुरे यांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी पकडलेले असल्याने व सदरचे ठिकाण हे खुप गर्दीचे असल्याने सदर ठिकाणी पुढील कामकाज करणे शक्य होणार नसल्याने श्री. त्रिपुटे यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे येण्यास सांगुन ते धडील यांना पकडलेल्या स्थितीत घेवुन शासकिय वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. मी त्यांचे पाठोपाठ सदर कार्यालयात गेलो. तेथे धडील यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर मला कक्षात बोलवुन माझ्या हाताच्या व पॅन्टच्या खिशाच्या तपासण्या करण्यात आल्या. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले. कारवाई दरम्यान श्री. त्रिपुटे यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक), अहिल्यानगर येथुन ताब्यात घेतलेल्या कागदपत्रांमधिल मा. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थींना आवश्यक निधी उपलब्ध करून मिळणेबाबत जा.क्र. सआमअ/तां/611/2025 दि. 20/03/2025 अन्वये पाठविलेला प्रस्ताव मला दाखविला. त्यात माझे पत्नीचे नाव लाभार्थीचे नाव असलेल्या यादीत दुस-या क्रमांकावर असल्याचे दिसुन आले.

तरी दिनांक 20/03/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 12/59 ते 14/13 वा. दरम्यान सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक), अहिल्यानगर या कार्यालयात तसेच 18/30 ते 19/36 वा. दरम्यान वरवंडी येथील श्री.गोरक्ष आडसुरे यांचे मोरया उदयोग समुहाचे उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी रमेशकुमार धडील, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक), अहिल्यानगर यांनी माझेकडे माझी पत्नी पौर्णिमा फुलसौंदर व बहिण स्वाती फुलसौंदर यांचे नावे मंजुर असलेल्या मत्स्य संवर्धन प्रकल्पांच्या अनुदानाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात 30,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 20,000/-रु. लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविली व वरवंडी येथील श्री.गोरक्ष आडसुरे यांचे मोरया उदयोग समुहाचे उद्घाटनाच्या

कार्यक्रमाच्या ठिकाणी लाचेच्या सापळा कारवाई वेळी 20/21 ते 20/36 वा. दरम्यान यातील यांनी मला " आजच्या यादीत एक नाव आहे बर का तुमचे" असे म्हणुन माझे पत्नीचे नाव असलेला प्रस्ताव पाठविल्याच्या मोबदल्यात व बहिणीच्या नावचा प्रस्ताव पाठविण्याकरीता 20,000/-रुपये लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक रणजकुमार जगन्नाथ घडील, वय 57 वर्ष, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग (तांत्रिक),अहिल्यानगर, वर्ग-1, ह.रा. परदेशी यांच्या घरात भाडयाने, डावरे गल्ली, अहिल्यानगर, मुळ रा. ए-5, ॲक्वालाईन रेसिडेन्सी, धोंगडे नगर नाशिकरोड, नाशिक यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sanjay Rajabhau Thenge(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.(क्र.):**

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
राहुरी पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Sanjay Rajabhau Th
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):